माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- ६२/२०२०**

**अपिलार्थी श्री. निलेश के. शाह**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभि. (परि.) एफ/उत्तर**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहा. आयुक्त यांचे कार्यालय,
९६, भाऊ दाजी मार्ग, माटुंगा (पूर्व), मुंबई ४०० ०१९

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता (एफ/उत्तर),**
विभाग कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, एफ/उत्तर विभाग, २ रा मजला,
९६,भाऊ दाजी मार्ग, माटुंगा (पूर्व), मुंबई ४०० ०१९

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २४.०६.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रकिंग रिपोर्ट नुसार दि. ०९.०६.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. ४५५७/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. १६६०/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ०३.०१.२०२० रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"अपिलार्थी यांनी दाखल केलेले व्दितीय अपील अर्ज कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून रुपांतरीत करण्यात येत आहेत."*

उक्त आदेशानुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) एफ/उत्तर, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, माटुंगा (पूर्व), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि.०३.०२.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) एफ/उत्तर, बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय, माटुंगा (पूर्व), मुंबई यांच्याकडून दि. २०.०२.२०२० रोजी आयोगास अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये नमुद केलेले आहे की, या कार्यालयामार्फत पत्र क्र. एफ.एन/४११४४ दि. १८.०२.२०२० अन्वये उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास देण्यात आलेली असुन सदर पत्राची छायांकित प्रत आपल्या महितीकरीता सोबत जोडण्यात येत आहे. सबब अपिलकर्ता निलेश के. शाह यांना दि. ०५.०३.२०१९ रोजीच्या माहिती अर्जात नमुद केलेली माहिती देण्यात आलेली आहे.

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता सुनावणी नोटीस प्राप्त असूनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे लेखी निवेदन आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, तक्रारकर्ता मागणी केलेली माहिती कार्यालयीन अभिलेखात शोध घेतला असता उपलब्ध नाही व त्याबाबत तक्रारकर्ता यांना कळविण्यात आलेले आहे.

..२/-

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना उत्तर देण्यात आलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे**

**मुंबई**
**दिनांक : २५.०६.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**